PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Don bayka fajiti aika
Year: 1982

Song: Lagin zhalyavari me
Lyricist: Jagdish Khebudkar

लगीन झाल्यावरी मी
सांगीन तसंच ऐकायचं
अहो लगीन झाल्यावरी मी
सांगीन तसंच ऐकायचं
अहो लगीन झाल्यावरी मी
बोलीन तसंच वागायचं
अहो लगीन झाल्यावरी मी
बोलीन तसंच वागायचं

रोज जेवणाचा थाट
घालू रंगीत पाट
म्होरं स्टेनलेसचं ताट
त्यात साखर भात
एका ताटात दोघं जेवायचं
अहो एका ताटात दोघं जेवायचं
लगीन झाल्यावरी मी
सांगीन तसंच ऐकायचं
अहो लगीन झाल्यावरी मी
बोलीन तसंच वागायचं

रंगम्हालावानी सजवू माडी जुनी
रंगम्हालावानी सजवू माडी जुनी
दोघं राजाराणी नको तिसरं कुणी
दोघं राजाराणी नको बाई तिसरं कुणी
मला पंख्यानं वारं घालायचं
हं... मला पंख्यानं वारं घालायचं
लगीन झाल्यावरी मी
सांगीन तसंच ऐकायचं
अहो लगीन झाल्यावरी मी
बोलीन तसंच वागायचं

दिस उगवंल तव्हा शेतावरती जावा
दिस उगवंल तव्हा शेतावरती जावा
सांच्यापारी जव्हा गार सुटंल हवा
सांच्यापारी जव्हा गार सुटंल हवा
पर झोपायला हिकडंच यायचं
हं... पर झोपायला हिकडंच यायचं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*